# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१३/०९/२०१६

**१) सार्वजनीक ठिकाणी मुर्तीची विटंबना करून लोकांचे धार्मीक भावना दु:खावल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी २१.०० वा दरम्यान यातील आरोपीने गोंडसावरी येथील हनुमान चौकात असलेल्या सार्वजनीक हनुमान मंदीरात प्रवेश करून हनुमान मुर्तीची व नंदीची कु–हाडीने तोडफोड करून विटंबना केल्यावरून गावातील लोकांच्या धार्मीक भावना दुखावल्याने व फिर्यादीचे दुकानासमोरील सिमेंटच्या पाय–यांची तोडफोड करून नुकसान केल्याने फिर्यादी गणेश रघुनाथ तुमसरे वय ४९ वर्ष रा. गोंडसावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९५,४२७ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) भंडारा पोलीस यांची कारवाई . :–**

दिनांक १२/०९/२०१६ रोजी १२.४५ वा दरम्यान यातिल गुप्तमाहीतगारा कडुन मिळालेल्या खब–यावरून आरोपी क्र. १ ही आपल्या राहत्या घरी बाहेरील मुलींना बोलावुन देह व्यापार करीत आहे अशा खबरेवरून धाडघातली असता आरोपी क्र. २ ही देह व्यापार करीत असतांना मिळुन आल्याने तिचे कडुन ५००/–रू. ची १ नोट, पुरूषार्थ जिवन कॅप्सुल १०/४ कि. १२८/–रू. गुलाबी रॅफर असलेले जरूर कंपनीचे कोन्डम कि. २०/–रू. ३ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल हॅन्डसेड कि. ६,८००/–रू. असा एकुण ७,४४८/–रू. चा माल राजगोपालचारी वार्ड भंडारा येथे मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३(२)(अ),४(२)(ख),५(१)(अ)(ग) अनैतीक व्यापार प्रती. अधीनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बंडीवार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) चिमुरडयाचा मृत्यु. :–**

दिंनाक. १२/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातिल फिर्यादीचे लग्न मिलींद राऊत यांचे सोबत २०१४ ला जाती रिवाजाने झाले असुन यांना ९ महिन्याचा मृतक मुलगा असुन यांच्या घरचे कारणा वरून पटत नसल्याने ३ महिन्यापासुन फिर्यादी ही आपल्या माहेरी बाळाला सोडुन असतांना मृतक मुलगा हा मरण पावल्याने फिर्यादीने दिर, सासु, सासरे यांचे कडे मुलगा राहत असल्याने फिर्यादीने यांच्यावर संशय व्यक्त केल्याने फिर्यादी तिरंगा मिलींद राऊत वय २६ वर्ष रा. सडक अर्जुनी जि. गोंदीया/ ह.मु. खोंडशिवनी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करित आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०४ केसेस, अवैध प्रवासी ०६ केसेस तसेच ईतर वाहनांवरती १२४ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

१३/९/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.